**ऊस पिकाखालील क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी योजनेच्या अंमलबजावणीबाबत कार्यपध्दती.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक: ससाका-२०१८/प्रक्र.५८/३-स,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: २७ एप्रिल, २०१८.

वाचा: १. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक: सुसिंयो-२०१७/प्र.क्र.५८/४अे, दिनांक २४.०७.२०१७.
२. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक: सुसिंयो-२०१७/प्र.क्र.५८/४अे, दिनांक १६.११.२०१७.
३. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक: सुसिंयो-२११५/प्र.क्र.३६२/४अे, दिनांक १२.१०.२०१५.

**परिपत्रक**

राज्यातील उपलब्ध पाणी साठयापैकी सुमारे ६० ते ७०% पाणी सिंचनासाठी वापरण्यात येते. राज्यात वारंवार पडणा-या दुष्काळाच्या पार्श्वभुमीवर पाण्याचे योग्य नियोजन करणे क्रमप्राप्त आहे. पाण्याच्या कमीतकमी वापरामध्ये जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी सुक्ष्म सिंचन हे तंत्रज्ञान उपयुक्त असल्याचे सिध्द झाले आहे. सदर तंत्रज्ञानामुळे सुमारे ३० ते ५०% पाण्याची बचत होते. सुक्ष्म सिंचनामुळे केवळ पाण्याचीच बचत होत नाही, तर खते, औषधे यांच्यावरील खर्चामध्ये सुध्दा बचत होते. एकंदरीत सुक्ष्म सिंचनामुळे शेतक-यांना लागणा-या खर्चात बचत होऊन शेतक-यांच्या उत्पादनात व उत्पन्नात वाढ झाल्याचे दिसून येते.

उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर आणि उत्पादकता वाढवण्यासाठी आणि बचत झालेले पाणी प्रकल्पाच्या पृष्ठ भागावर समन्यायी तत्वावर उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दि.२५ जून, २०१५ च्या अधिसूचनेन्वये १) टेंभू उपसायोजना २) भीमा (उजनी) ३) मुळा ४) निम्नमाना ५) हतनूर ६) उर्ध्वपूस ७) कान्होळी नाला (नागपूर) व ८) आंबोली (सिंधुदुर्ग) या पथदर्शक प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील बारमाही पिकांना सिंचनासाठी ठिबक व तुषार सिंचन या सारख्या सिंचन पध्दतीचा जून-२०१८ पर्यत अवलंब करण्याचे अनिवार्य केले आहे. वरील पथदर्शक प्रकल्पावर ठिबक/तुषार सिंचन पध्दतीचा अवलंब झाल्यानंतर आलेल्या अनुभवांच्या आधारे हा निर्बंध राज्यातील अन्य प्रकल्पांवर सन २०१९ पासून लावण्यात येणार आहे.

ऊस हे बारमाही बागायती पीक आहे. शेती करण्यासाठी तरुण व सुशिक्षित शेतक-यांची वाढणारी संख्या, मुक्त अर्थव्यवस्था, दळणवळणाच्या सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता

प्रसार यामुळे इतर नगदी पिकांबरोबर ऊसाखालील क्षेत्र वाढत आहे. या वाढत्या क्षेत्रामुळे पाण्याची गरजसुध्दा वाढत आहे. ऊसाकरिता त्याच्या पुर्ण वाढीच्या कालावधीत २५००० घनमीटर/हे. इतक्या पाण्याची आवश्यकता असते. ऊस पिकासाठी ठिबक सिंचनाचा वापर केल्यास ३० ते ५०% पाण्याची बचत होते. म्हणजेच ७५०० ते १२५०० घनमीटर/हे. इतक्या पाण्याची बचत होवू शकते. यास्तव, ऊस पिकाखालील क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणणे आवश्यक आहे.

राज्यामध्ये ऊस पिकाखालील सर्वसाधारण ९.४२ लाख हे. क्षेत्र आहे. सदर क्षेत्रापैकी २.२५ लाख हे. एवढे क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्यात आले आहे. बसविण्यात आलेल्या ठिबक सिंचन संचाखालील क्षेत्र वजा जाता अद्यापी ७.१८ लाख हे. क्षेत्र सिंचनाखाली आणण्यास वाव आहे. तथापि, प्रवाही सिंचनाव्दारे देण्यात येणा-या २ पाळयांच्या अंतरातील तफावतीमुळे सध्याच्या कालव्याची व्यवस्था व पाणी पुरवठा हे सुक्ष्म सिंचन पध्दतीस उपयुक्त नाही. लाभ क्षेत्रातील ऊस पिकाखालील क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी प्रथम पाणीसाठा उभारणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी प्राथमिक सुविधा उभारण्यास काही कालावधी अपरिहार्य आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता सद्यस्थितीत नद्या, नाले, विहिरी, नैसर्गिक प्रवाह, ओढे यांच्या पाण्यावर पिकवल्या जाणा-या पिकाखालील क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणणे शक्य आहे. या बाबी विचारात घेऊन पहिल्या टप्यात नद्या, नाले, विहिरी, नैसर्गिक प्रवाह, ओढे यांच्या पाण्यावर पिकवल्या जाणा-या पिकाखालील क्षेत्र सन २०१८-१९ या वर्षात १.५ लाख हेक्टर व २०१९-२० या वर्षात १.५५ लाख हेक्टर या प्रमाणे ३.०५ लाख हेक्टर क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी योजनेची अंमलबजावणी कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या शासन निर्णय दिनांक २४ जुलै, २०१७ प्रमाणे करण्यात येत आहे. या शासन निर्णयाच्या अनुषंगाने या योजनेच्या अंमलबजावणी करण्यासंदर्भात कार्यपद्धत व मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

०१. उपरोक्त पार्श्वभूमीवर सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यपध्दती व मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत:-

i) सदर योजना राज्यातील सहकारी तसेच खाजगी साखर कारखान्यांसाठी राबविण्यात येईल. कृषी विभागाच्या दि.२४.७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये वरील प्रस्तावनेत नमूद आठ लाभक्षेत्रात ऊस पीकासाठी ठिबक सिंचन बंधनकारक आहे. सदरची योजना उपरोक्त लाभक्षेत्रातील सर्व कारखान्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादकांना लागू राहील.

ii) सदर योजना नद्या, नाले, विहिरी याव्दारे सिंचित होणारे क्षेत्र व सामुहिक उपसा सिंचनव्दारे सिंचित होणा-या क्षेत्रावर सन २०१८-१९ या वर्षात १.५ लाख हेक्टर व

२०१९-२० या वर्षात १.५५ लाख हेक्टर या प्रमाणे ३.०५ लाख हेक्टर क्षेत्रावर राबविण्यात येईल.

iii) सदर योजनेअंतर्गत नाबार्डकडून दीर्घ मुदतीचे कर्ज घेऊन शेतक-यांना सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल. नाबार्डकडून घेण्यात येणा-या कर्जाचे वाटप शेतक-यांना राज्य सहकारी शिखर बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक या कर्ज साखळीतून करण्यात येईल. या योजनेत प्राथमिक कृषी पत संस्था(विविध कार्यकारी सहकारी संस्था) यांचा सहभाग राहणार नाही. या योजनेअंतर्गत विविध स्तरांवर कर्जाची रक्कम खालील व्याजदराने उपलब्ध करण्यात येईल:-

- नाबार्डकडून राज्य सहकारी शिखर बँकेस कर्ज - ५.५०%
- राज्य शिखर बँकेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना कर्ज - ६%
- जिल्हा मध्यवर्ती बँकांनी शेतक-यांना कर्ज - ७.२५%

iv) शेतक-यांना देण्यात येणा-या सदर कर्जाचे नियमित व्याज अदायगीचे दायित्व शासन, साखर कारखाना व शेतकरी यांच्यामध्ये खालीलप्रमाणे असेल:-

| | |
|---|---|
| राज्य शासन | - ४% |
| साखर कारखाना | - १.२५% |
| शेतकरी | - २% |

सदर शासन हिश्श्याच्या ४% व्याजाची तरतूद कृषी विभागामार्फत करण्यात येईल. म्हणजेच शेतकऱ्यांना सदर कर्ज २% व्याज दराने उपलब्ध करुन देण्यात येईल.

v) सदर कर्जासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्याकडे किमान २० गुंठे ऊस क्षेत्र असणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत केवळ ५ हेक्टरच्या व प्रतिहेक्टरी रु.८५,४००/-च्या मर्यादेत शेतक-यांना २% या सवलतीच्या व्याज दराने ५ वर्षाच्या कालावधीसाठी कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

vi) कर्जासाठी अर्ज करणे, बँकेमार्फत कर्ज अर्जाची तपासणी अंती कर्ज वितरण करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

- सदर अनुक्रमांक (v) लक्षात घेऊन पात्र लाभार्थी शेतकऱ्याने या योजनेअंतर्गत ठिबक सिंचनासाठी कर्ज घेण्याबाबत बँकेने साखर कारखान्याकडे उपलब्ध करुन दिलेल्या विहीत नमून्यात अर्ज सादर करावा. त्यासोबत आवश्यक ते कागदपत्र, पाहणी अहवाल व कृषी

आयुक्त यांनी विहीत केलेल्या ठिबक सिंचन कंपनीपैकी त्यांच्या पसंतीच्या कंपनीचे कोटेशन जोडावे.

- प्राप्त झालेले अर्ज निकषाप्रमाणे पात्र असल्याची खात्री करुन अर्जासोबतच्या त्रिपक्षीय करारनाम्यातील कारखान्याशी निगडीत बाबी मान्य असल्याबाबत स्वाक्षरी करुन कारखान्याने पात्र शेतकऱ्यांचे अर्ज संबंधित बँकेकडे सादर करावेत.
- संबंधित बँकेने सदर प्राप्त अर्जाची छाननी करुन आठ दिवसांच्या आत पात्र अर्जदारांच्या प्रकरणी करारनाम्यावर स्वाक्षरी करुन कर्ज मंजूर करावे व ठिबक संच बसविण्यासाठी शेतकऱ्याने निवडलेल्या पुरवठादार कंपनी/ वितरक यांना कार्यारंभ आदेश बँकेच्या स्तरावरुन देण्यात यावेत. तसेच, कर्ज मंजूर करण्यात आलेल्या शेतकऱ्यांबाबत वरील प्रमाणे कार्यवाही केल्याचे संबंधित कारखान्यास तसेच शेतकऱ्यांनाही बँकेमार्फत कळविण्यात यावे.
- कर्जासाठी पात्र लाभार्थी शेतकऱ्यांच्या यादीसह कार्यारंभ आदेश बँकेकडून प्राप्त झाल्यानंतर कंपनी/पुरवठादाराने ८ दिवसांचे आत संच उभारणी करावी. ठिबक सिंचन संच कंपनी/पुरवठादाराने ISI प्रमाणित गुणवत्ता पूर्ण संच/साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. सदरचे ठिबक सिंचन संच कोणत्याही परिस्थितीत जुने अथवा यापुर्वी वापर केलेले नसावेत. याप्रमाणे, कार्यपुर्ती केल्याबाबतचा अहवाल ठिबक सिंचन संच पुरवठादार कंपनी/वितरकांनी संबंधित साखर कारखाना व बँकेस बिलासोबत सादर करावा.
- कंपनीने ठिबक संच समाधानकारकपणे बसविल्याबाबतचा अहवाल संबंधित कृषी विभागाच्या संबंधित अधिका-याकडे पाठवेल. तसेच त्याची एक प्रत संबंधित साखर कारखान्याच्या मुख्य शेतकी अधिकारी यांनाही सादर करेल. सदर अहवाल प्राप्त झाल्यापासून सात दिवसाच्या आत कृषी विभागाचे तपासणी अधिकारी ठिबक संचाची पहाणी करुन शेतकरी व कंपनीच्या प्रतिनिधीसह कारखान्याच्या मुख्य शेतकरी अधिकाऱ्यांस पाठवतील. तदोपरांत मुख्य शेतकरी अधिकारी आपल्या स्वाक्षरी व शिफारसीसह बँकेस पाठवतील. या अहवालाच्या आधारे बँक संबंधित कंपनीस कर्जाची रक्कम वितरीत करेल.
- बसविलेल्या ठिबक संचांचे नमुने गुणवत्ता तपासणीसाठी कृषी विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल. जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी याबाबत गुणवत्ता प्रमाणपत्र निर्गमित करतील. गुणवत्तेबाबत काही त्रुटी आढळल्यास नमुना तपासणीसाठी प्रयोग शाळेत पाठविण्याची जबाबदारी तपासणी अधिकाऱ्याची राहील. तपासणी अहवालात ठिबक संच गुणवत्तापुर्ण नसल्याचे आढळुन आल्यास पुरवठादार कंपनी/वितरकावर कार्यवाही कृषी विभागामार्फत करणेत येईल.

- जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी यांचेकडून गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर बँक कर्जाची रक्कम शेतकऱ्यांच्या सहमतीने ठिबक संच पुरवठादार/वितरकास अदा करेल. ठिबक संचासाठी विहित मर्यादेपेक्षा जादा खर्च येत असल्यास ती रक्कम लाभार्थ्यांनी संबधित कंपनी/वितरकास स्वनिधी स्वरुपात थेट अदा करणे आवश्यक राहील.
- त्रिपक्षीय करारनाम्यात नमूद अटींप्रमाणे लाभार्थी शेतकऱ्यास संबंधित कारखान्यास ऊस घालणे बंधनकारक राहील. तसेच, त्या करारनाम्यातील इतर अटी-शर्ती जसे की, घेतलेल्या कर्जापोटी मुद्दलासह शेतकऱ्यांच्या हिश्श्याची २% प्रमाणे व्याजाची रक्कम तसेच कारखान्याची १.२५% रक्कम मुद्यलासह शेतकऱ्यांना देय असलेल्या ऊस बीलाच्या रकमेतून कारखान्यामार्फत कपात करुन घेणे इत्यादीचे पालन करणे देखील बंधनकारक राहील.

vii) ऊस पिकाखालील क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी राबविण्यात येणारी योजना ज्या भागामध्ये राबविली जाईल. त्या भागामध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत प्रती थेंब अधिक पीक घटकाखाली राबविण्यात येणारी केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना ऊस पिकासाठी बंद करण्यात यावी.

viii) या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यास्तव गठीत केलेल्या मंत्रीमंडळ उपसमिती मार्फत आवश्यक त्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

ix) साखर कारखान्याच्या गाळप क्षमता वाढीचे प्रस्ताव सादर करताना कारखान्याच्या परिक्षेत्रातील ऊस पीकाखाली असलेल्या क्षेत्राचे किमान ५०% क्षेत्र ठिबक सिंचनाखाली असणे अनिवार्य राहील.

०२. सदर योजनेची राज्य पातळीवर अंमलबजावणी व संनियंत्रण साखर आयुक्त यांच्यामार्फत करण्यात येईल. या योजनेत विविध शासकीय विभाग व यंत्रणांचा सहभाग अपेक्षित असल्याने या योजनेची प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रण होण्याच्या दृष्टीने सर्व संबंधितांचा समावेश असलेली राज्य स्तरीय समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे:-

| | |
|---|---|
| १. आयुक्त साखर | -अध्यक्ष |
| २. आयुक्त कृषी | -सदस्य |
| ३. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे | -सदस्य |
| ४. व्यवस्थापकीय संचालक, वसंतदादा साखर संशोधन केंद्र, पुणे | -सदस्य |
| ५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक | -सदस्य |
| ६. व्यवस्थापकीय संचालक, साखर संघ, मुंबई | -सदस्य |
| ७. संबंधित लाभक्षेत्राचे मुख्य अधिक्षक अभियंता (जलसंपदा) | -सदस्य |

८. संबंधित लाभक्षेत्राचे उपमुख्य कार्यकारी
अधिकारी (जलसंधारण) -सदस्य
९. मुख्य महाप्रबंधक, नाबार्ड, पुणे -सदस्य
१०.विभागीय कृषी सह संचालक, कृषी विभाग -सदस्य
११.सहसंचालक (विकास) साखर आयुक्तालय, पुणे -सदस्य सचिव

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

i) सदर योजना व्यवस्थितरित्या राबविण्यासाठी आराखडा तयार करणे.
ii) सदर योजना राबविण्यासाठी या योजनेत संबंधित कारखाने व जास्तीत जास्त शेतकरी सहभागी होण्यास प्रवृत्त करण्यासाठी सर्वदूर प्रचार/प्रसिध्दी करणे/ बैठका/कार्यशाळा इ. घेणे.
iii) समितीमार्फत दर महीन्याला किमान एकदा किंवा आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी बैठका आयोजित करुन आलेल्या/येणाऱ्या अडी-अडचणींचा सर्वकष आढावा घेऊन उपाय योजना करणे.
iv) या योजनेअंतर्गत विविध यंत्रणांमार्फत करावयाच्या कार्यवाहीबाबत चर्चा करुन समितीच्या सदस्यांमार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निश्चित करणे व त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घेणे.
v) जिल्हा पातळीवरील समित्या तसेच स्थानिक पातळीवर कारखान्याच्या स्तरावर विविध समित्यांच्या कामकाजाचा आढावा घेऊन त्यांना वेळोवेळी सूचना व निर्देश देणे.
vi) मंत्रीमंडळ उपसमितीच्या निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करणे.
vii) योजनेच्या अंमलबजावणीचा प्रगती अहवाल दर महीन्याला शासनास सादर करणे.

**०३. योजनेच्या अंमलबजावणीसंबंधी यंत्रणा व त्यांच्या जबाबदाऱ्यां सदर्भात तपशील:-**

यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे राज्यपातळीवर या योजनेची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याची प्रमुख जबाबदारी साखर आयुक्त यांची राहील. तथापि, सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य पातळीवरील समितीतील विविध यंत्रणांचा सहभाग असल्याने त्या यंत्रणांमार्फत विहीत केलेल्या जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडणे आवश्यक आहे. हे लक्षात घेता सदर योजनेअंतर्गत साखर आयुक्तांसह कृषी आयुक्त, सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, साखर कारखाने इ. यंत्रणांतील अधिकारी यांनी पार पाडावयाच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे विहीत करण्यात येत आहेत. या जबाबदाऱ्या परिपूर्ण नसून स्पष्टीकरणात्मक आहेत.

### १. साखर आयुक्त, पुणे:-

राज्यपातळीवर सदर योजनेच्या अंमलबजावणीचे 'संनियत्रक' या नात्याने साखर आयुक्त, पुणे त्यांच्या अधिनस्त अधिका-यांच्या मदतीने खालीलप्रमाणे कार्यवाही करतील:-

- सदर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने निश्चित केलेल्या उद्दिष्टाप्रमाणे आवश्यक असलेल्या रकमेचा अंदाज घेऊन ती उपलब्ध करुन देण्याबाबत नाबार्ड/राज्य सहकारी बँक यांच्याकडे पाठपुरावा करणे.
- सदर योजनेसाठी प्रथम टप्प्यात शासन हिश्श्यातील व्याजापोटी जितक्या रकमेची आवश्यकता आहे, याबाबतचा सर्व संबंधितांचा आढावा घेवून सदर तरतूद कृषी आयुक्तामार्फत अर्थसंकल्पिय तरतूद करण्यासाठीचा प्रस्ताव विभागास सादर करणे आणि त्यानुसार संपूर्ण तरतूद अर्थसंकल्पात मंजूर करुन घेणे. तसेच योजनेच्या आकृतीबंधाप्रमाणे कर्जावर १.२५% व्याज अदा करण्याबाबतचा वाटा उचलण्याबाबत संबंधित सिंचन प्रकल्पांतर्गत लाभ क्षेत्रातील कारखान्यांना तसेच या योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी सर्वदूर प्रचार व प्रसिध्दी करणे. यासाठी लागणारा निधी कृषी आयुक्त यांच्याकडून उपलब्ध करुन घेणे.
- कर्जासाठी पुरेसे अर्ज कारखान्यांच्या स्तरावर बँकांमार्फत उपलब्ध करुन देणे. अर्जासोबत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, संबंधित साखर कारखाना व लाभधारक शेतकरी यांच्या दरम्यान करावयाच्या त्रिपक्षीय/सामंजस्य कराराचा मसूदा तयार करुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना उपलब्ध करुन देणे.
- सदर योजनेत सहभागी होण्यासाठी साखर कारखाने, बँका व शेतकरी यांना प्रवृत्त करणे, साखर कारखान्यांमार्फत त्याच्या कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ऊस क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आणण्यासाठी दिलेल्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने शेतकऱ्यांकडून कर्जाबाबतचे अर्ज प्राधान्याने बँकांना उपलब्ध करुन देणे.
- शेतकऱ्यांच्या अर्जातील अटी-शर्तींची पूर्तता करुन सदर अर्ज कारखान्याकडून जिल्हा/राज्य सहकारी बँकांना देण्याकरिता कारखान्यांना वेळोवेळी सूचना देणे. मंजूर केलेल्या पात्र कर्ज प्रकरणांसाठी लागणारी रक्कम बँकांना उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य सहकारी बँकेला कळविणे.
- योजनेसाठी पात्र होणारे कारखाने तसेच शेतकरी यांना सदर योजना त्यांच्या शेतामध्ये राबविण्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांमार्फत करावयाच्या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घेणे. तसेच, आवश्यकतेप्रमाणे जिल्हा किंवा स्थानिक पातळीवर समित्या नियुक्त करणे.
- या योजनेतर्गंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना पुनर्वित्त पुरवठा होण्यासाठी नाबार्ड व राज्य सहकारी बँकेशी आवश्यक तो समन्वय ठेवणे.

- शेतक-यांचा ऊस गाळपासाठी कारखान्यास उपलब्ध झाल्यानंतर त्यांना देय ठरणाऱ्या रकमेतून कारखान्यांमार्फत कर्जाचे हप्ते व्याजासह वसूल करण्याबाबतच्या कार्यवाहीचे संनियंत्रण करणे.
- शेतकऱ्यांच्या ऊस बिलामधून बँकांचे हप्ते वेळोवेळी वसूल होण्यासाठी संबंधित साखर कारखान्यांना सूचना देणे आणि नियमित वसुली होण्यासाठी कार्यक्रमाची आखणी करणे. शेतक-यांकडून हप्त्यांची वसूलीचे सनियंत्रण जिल्हा/स्थानिक स्तरीय समितीमार्फत प्रभावीपणे करण्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करणे. एखाद्या शेतकऱ्याने, करारनाम्यानुसार कर्जासाठी १.२५% प्रमाणे व्याजाची हमी दिलेल्या, साखर कारखान्याला ऊस न घालता इतर कारखान्यांकडे ऊस दिल्यास त्या इतर कारखान्यांकडून कारखान्याच्या व संबंधित शेतकरी यांच्या हिश्श्याच्या रकमेची व्याजासह वसूली करुन घेणे.
- सिंचन प्रकल्पांतर्गत लाभ क्षेत्रातील साखर कारखान्यांची जिल्हानिहाय यादी तयार करुन सर्व संबंधितांच्या माहितीसाठी उपलब्ध करुन देणे.

**२. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे:-**

- या योजनेत सहभागी होवून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना ठिबक सिंचनासाठी कर्ज उपलब्ध करण्यासाठी राज्य/जिल्हा सहकारी बँकांना सूचना देणे. तसेच या कर्जासाठी लागणारी रक्कम मिळवून देण्याकरिता नाबार्ड/राज्य सहकारी बँकेबरोबर समन्वय व पाठपुरावा करणे.
- संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना कारखान्यांकडून प्राप्त झालेले अर्जांच्या अनुषंगाने कर्ज मंजूर व वितरीत करण्याकरीता सर्व बाबींची तातडीने पूर्तता करण्याबाबत बँकांना सूचना देणे.
- साखर कारखान्यांमार्फत योजनेअंतर्गत प्राप्त कर्ज अर्जाच्या अनुषंगाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या मागणीनुसार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस निर्देश देणे.
- सदर योजना राबवित असताना त्यामध्ये सहभागी बँकांना काही अडचणी असल्यास नाबार्ड तसेच बँक अधिकाऱ्यांशी सल्ला मसलत करुन त्या अडचणीचे निराकरण करणे. या योजनेतर्गत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकानी शेतकऱ्यांना थेट कर्ज पुरवठा करणे अभिप्रेत असल्याने यामध्ये विविध कार्यकारी संस्थांचा सहभाग असणार नाही. अशा आशयाच्या सुस्पष्ट सूचना राज्य/जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना देणे.
- राज्य सहकारी बँकेकडून प्राप्त झालेली कर्जाची रक्कम विहीत केल्याप्रमाणे वितरित करण्याबाबत जिल्हा बँकांना वेळोवेळी सूचना देणे.

- ज्या जिल्ह्यामध्ये जिल्हा सहकारी बँक कमकुवत असेल अशा जिल्ह्यांमध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकांसाठी विहित केलेल्या जबाबदाऱ्या राज्य सहकारी बँकेमार्फत पार पाडल्या जातील, याद्दष्टीने वेळोवेळी आढावा घेणे, मार्गदर्शन करणे इ.
- ऊस पिकाखालील क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्याकरिता कर्ज योजनेतील प्रगतीबाबत स्वतंत्र विषय ठेवून राज्य पातळीवर होणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठकीत आढावा घेणे.

**३. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक:-**

- साखर आयुक्त यांच्या मागणीप्रमाणे या योजनेसाठी लागणारी रक्कम नाबार्डकडून मंजूर करुन घेऊन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना उपलब्ध करुन देणे.
- ज्या जिल्ह्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँक कमकुवत आहे, अशा जिल्ह्यामध्ये राज्य सहकारी बँकेने आपल्या शाखांमार्फत जिल्हा सहकारी बँकांना खालील अ.क्र. ३ (४) मध्ये नेमून दिलेल्या तसेच वरील परिच्छेद १ (vi) मध्ये नमूद केलेल्या विविध जबाबदाऱ्या विहित केल्याप्रमाणे पार पाडणे.
- शेतकऱ्यांनी दाखल केलेल्या अर्जाची छाननी करुन पात्र अर्ज अंतिम मंजूरीसाठी तयार ठेवणे, कर्ज मंजूर करणे, वितरित करणे इ. नेमून दिलेल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडणे.
- सदर योजनेअंतर्गत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना कर्ज योजनेच्या अंमलबजावणीसाठी निर्देश देणे.
- ऊस पिकाखालील क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्याकरिता कर्ज योजनेचा जिल्हा स्तरावरील आढावा सभेच्या वेळेस स्वतंत्र विषय ठेऊन त्याचा वेळोवेळी आढावा घेणे.

**४. जिल्हा मध्यवर्ती बँका:-**

- ऊस पिकासाठी सुक्ष्म सिंचन कर्ज योजनेचा प्रचार, प्रसिध्दी, मेळावे आयोजित करणे.
- साखर कारखान्यांना सदर योजनेअंतर्गत कर्ज अर्ज, त्रिपक्षीय करार व इतर अनुषंगिक कागदपत्रे कारखान्यांना उपलब्ध करुन देणे.
- शेतक-यांना कर्ज मिळविण्यासाठी लागणारे अर्ज कारखान्यामार्फत सर्व अटी शर्तीची पूर्तता करुन बँकेत जमा करुन घेणे व त्याची छाननी आठ दिवसात करुन कर्ज मंजूरीस पात्र शेतकऱ्यांची यादी कारखान्यास देणे.

- वरिल परिच्छेद १ (vi) मध्ये नमूद केलेल्या विविध जबाबदाऱ्या विहित केल्याप्रमाणे पार पाडणे.
- ठिबक सिंचन संच कार्यान्वित झाल्याचा अहवाल वरील परि.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी यांच्याकडे प्राप्त होताच विहित केल्याप्रमाणे कर्जाची रक्कम संबंधित ठिबक सिंचन कंपनीस वितरीत करणे.
- मंजूर कर्जाच्या बाबतीत देय असलेली वार्षिक मुद्दलाची रक्कम साखर कारखान्यांकडील १.२५% व शेतकऱ्यांकडील २% याप्रमाणे व्याजासह साखर कारखान्यांकडून वसूल करणे.
- कारखान्यांकडून प्राप्त मुद्दल व व्याजाची रक्कम पूर्णपणे वसूल झालेल्या प्रकरणी या योजनेअंतर्गत शासन दायित्व ४% व्याजाची गणना करुन संबंधित प्रादेशिक सहसंचालक साखर यांचेमार्फत साखर आयुक्त कार्यालयास प्रस्ताव सादर करणे. साखर आयुक्त यांनी शासनाकडून प्राप्त झालेले ४% व्याज प्रतिपूर्तीचा निधी संबंधित बँकेला वितरीत करणे.

**५. सहकारी/खाजगी साखर कारखाने:-**

- साखर कारखानाच्या क्षेत्रात ऊस पिकासाठी ठिबक सिंचन कर्ज योजनेचा प्रचार/प्रसिध्दी करणे व योग्य लाभार्थ्यांची निवड करणे.
- विशेष मोहिमेद्वारे कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी प्रेरित करुन कर्जाचे अर्ज पात्र शेतक-यांकडून भरुन घेणे व योजनेच्या आकृतीबंधानुसार देय व्याजापैकी १.२५% रकमेचा वाटा उचलण्यास सहमती/सहभाग दर्शविण्यासाठी त्रिपक्षीय करारनाम्यावर स्वाक्षरी करुन परिपूर्ण अर्ज जिल्हा मध्यवर्ती/राज्य सहकारी बँकेत जमा करणे व मंजूर करुन घेणे.
- शेतकऱ्यांच्या अंतिम देयकातून विहित केल्याप्रमाणे कर्जाची रक्कम व्याजासह कपात करुन बँकेत जमा करणे व याबाबत साखर आयुक्त यांच्या आदेशानुसार वेळोवेळी कार्यवाही करणे.
- मंजूर कर्जावरील देय व्याजापैकी १.२५% व्याजाची हमी देणाऱ्या साखर कारखान्यास करारनाम्यानुसार संबंधित शेतकऱ्याने गाळपासाठी ऊस न घातल्यास अशा प्रकरणी ज्या साखर कारखान्यास ऊस गाळपासाठी दिला असेल, त्या कारखान्याने मंजूर कर्जापोटी ऊस बिलातून शेतकरी यांच्या हिश्श्याची मुद्दल व व्याजाची रक्कम कपात करुन कारखान्याच्या हिश्श्यापोटी १.२५% व्याजाच्या रकमेसह बँकेत जमा करणे.

**६. कृषी आयुक्त:-**

- योजनेअंतर्गत जास्तीत जास्त शेतकरी जमीन ऊस पिकासाठी ठिबक सिंचनाखाली आणतील या अनुषंगाने प्रचार/प्रसिध्दी करणे. तसेच, याबाबतीत आवश्यकतेप्रमाणे निधी साखर आयुक्त यांना उपलब्ध करुन देणे.
- मंत्रिमंडळ उपसमिती तसेच अपर मुख्य सचिव कृषी यांच्या अध्यक्षतेखाली झालेलया सभांमध्ये ठरल्याप्रमाणे या योजनेच्या अमंलबजावणीसाठी आवश्यक मनुष्यबळ साखर आयुक्त कार्यालयास उपलब्ध करणे तसेच प्रादेशिक सहसंचालक साखर यांच्या कार्यालयातील कृषी विभागाकडील रिक्त पदे तातडीने भरणे.
- राज्यातील नामांकीत व नोंदणीकृत ठिबक संच वितरीत करणाऱ्या कंपनी व वितरकांची यादी ठिबक संचाच्या दरासह प्रसिध्द करणे.
- शेतकऱ्यांच्या जमीनीमध्ये ऊस पीकासाठी बसविलेल्या ठिबक संचांचे नमुने गुणवत्ता तपासणीसाठी कृषि विभागामार्फत कार्यवाही करणे.
- जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी याबाबत गुणवत्ता प्रमाणपत्र निर्गमित करतील. गुणवत्तेबाबत काही त्रुटी आढळल्यास नमुना तपासणीसाठी प्रयोग शाळेत पाठविण्याची जबाबदारी तपासणी अधिकाऱ्याची राहील. तपासणी अहवालात ठिबक संच गुणवत्तापुर्ण नसल्याचे आढळुन आल्यास पुरवठादार कंपनी/वितरकावर कार्यवाही कृषि विभागामार्फत करणेत येईल.
- ठिबक सिंचन संच पुरवठादार/कंपनीला अंतिम देयके अदा करण्यासाठी बसविण्यात आलेल्या ठिबक संचाचे गुणवत्ता प्रमाणपत्र जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्यामार्फत बँकेस सादर करणे.
- सुक्ष्म सिंचन साहित्याचे विक्री पश्चात वार्षिक देखभाल दुरुस्तीचे सेवा दर निश्चित करणे.
- साखर कारखाना कार्यक्षेत्रातील निवडलेल्या लाभार्थींचे ठिबक/तुषार संच हाताळणी व देखभाल दुरुस्ती संबधी प्रशिक्षण आयोजित करणे.
- ऊस उत्पादकता वाढविण्यासाठी प्रगतशील शेतकऱ्यांचे प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करणे.
- ठिबक सिंचनाखालील अतिउच्च ऊस उत्पादकतेसाठी बक्षीस योजना प्रस्तावित करणे.
- कर्ज योजनेअंतर्गत प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने ४% शासन दायित्व रक्कमेची तरतुद करणे.

- लाभ क्षेत्रातून पाण्याची आवर्तने महिन्यातून एकदाच होत असल्याने व ठिबकसाठी पाणी सातत्याने लागत असल्याने पाणी साठविण्याची साधने निर्माण करणे. (उदा. वैयक्तीक व सामुहिक शेततळे).

**७. जलसंपदा विभाग:-**

- सिंचन प्रकल्पाअंतर्गत लाभ क्षेत्रातील गावनिहाय व सर्व्हे नंबर निहाय क्षेत्र संबधित साखर कारखान्यांना तसेच कृषी आयुक्त व साखर आयुक्तांना कळविणे.
- कालवे निहाय पाणी वापर संस्था यांनी ऊस उत्पादक शेतकरी यांना ठिबक सिंचनाचा वापर करणे बंधनकारक करणे.
- पाणी वापर संस्थेच्या माध्यमातून पाणी बचतीचे व कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्यासंदर्भात ठिबक/तुषार वापरासंबधी प्रचार प्रसिध्दी करणे.

**८. जलसंधारण विभाग :-**

- सदर लाभक्षेत्रातील साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रांतर्गत गावाची निवड जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत आराखड्यामध्ये झाली असल्यास व संबंधित गावात ऊस पिकाची लागवड होत असल्यास त्या ठिकाणी ठिबक संच उपयोगी होण्याच्या दृष्टीने पाणी साठविण्यासाठी शेततळे, सिमेंट बंधारे इ. कामे प्राधान्याने हाती घेऊन पूर्ण करणे.
- जलयुक्त शिवार अभियानअंतर्गत प्रकल्प आराखडयामध्ये ऊसाला ठिबक याचा अंतर्भाव करुन ग्राम सभेमध्ये ऊसाला १००% ठिबक वापरासंबधी ठराव करणे.

**९. जिल्हा स्तरीय समिती:-**

स्थानिक पातळीवर सदर योजनेची अंमलबजावणी सुव्यवस्थित होण्यासाठी व राज्य स्तरीय समितीला मदत होण्यासाठी संदर्भाधीन कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक: सुसिंयो-२११५/प्र.क्र.३६२/४अे, दिनांक १२.१०.२०१५ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा स्तरीय समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश करण्यात येत आहे:-

| | |
|---|---|
| प्रादेशिक सहसंचालक (साखर) | - सदस्य |
| जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था | -सदस्य |
| कार्यकारी संचालक, जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक | -सदस्य |
| जिल्हा विकास व्यवस्थापक, नाबार्ड | -सदस्य |

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

i) योजना राबविण्यासाठी सर्व कारखाने/शेतकरी प्रवृत्त होतील यानुषंगाने प्रसिध्दी करुन जास्तीत जास्त शेतकरी यामध्ये सहभागी कसे होतील. यासाठी सर्व कारखाने/शेतकरी यांना प्रादेशिक सहसंचालक, साखर यांच्यामार्फत प्रवृत्त करणे.

ii) सदर कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्वंकष आढावा घेऊन राज्यस्तरीय समितीस वेळोवेळी अहवाल/माहिती देणे.

iii) सदर योजना व्यवस्थितरित्या राबविण्यासाठी राज्यस्तरीय समितीस आवश्यक ती माहीती सादर करणे.

iv) शेतकऱ्यांच्या ऊस बिलांमधून बँकांचे हप्ते वेळोवेळी वसूल होण्यासाठी प्रादेशिक सहसंचालक साखर यांनी तपासणी करुन आढावा घेणे. शेतक-यांना देय ठरणाऱ्या रकमेतून कर्जाचे हप्ते वसूल करण्याबाबतची कार्यवाही व सनियंत्रण करणे.

v) शेतक-यांकरिता बसविलेल्या ठिबक संच हे गुणवत्ता पुर्ण असतील याची खात्री करणे व या संदर्भातल्या अडीअडचणींचे निराकरण जिल्हा कृषी अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत करुन घेणे.

vi) सदर योजना राबविण्यासाठी बँकांना सहभागी करुन घेण्यात काही अडचणी असल्यास त्या अडचणीचे निराकरण विभागीय कार्यालय, नाबार्ड तसेच विभागीय बँक अधिकाऱ्यांशी सल्ला मसलत करुन जिल्हा उपनिबधंक, सहकारी संस्था यांच्या मार्फत करणे.

vii) कारखाना स्तरावरील गठीत केलेल्या अंमलबजावणी समितीच्या कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेणे व आवश्यकतेनुसार निर्देश देऊन त्याप्रमाणे अंमलबजावणी करुन घेणे.

**१०. अंमलबजावणी समिती:-**

सदर योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी साखर कारखान्याच्या स्तरावर अंमलबजावणी समिती खालीप्रमाणे गठीत करण्यात येत आहे:-

| | |
|---|---|
| संबधित कारखान्यांचे कार्यकारी संचालक | -अध्यक्ष |
| कृषी विभागातील स्थानिक मंडळ कृषी अधिकारी | -सदस्य |
| जिल्हा/ राज्य सहकारी मध्यवर्ती बँक प्रतिनिधी | -सदस्य |
| स्थानिक शाखा अभियंता (जलसंपदा) | -सदस्य |
| प्रगतशील शेतकरी प्रतिनिधी | -सदस्य |
| कारखान्यांचे मुख्य शेतकी अधिकारी | -सदस्य सचिव. |

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

i) साखर कारखाना क्षेत्रातील लाभार्थ्यांची निवड करुन त्यांना ठिबक सिंचनाबद्‌दलची उपयुक्तता व महत्व पटवून प्रवृत्त करणे.

ii) साखर कारखान्यांच्या कृषी अधिकारी यांच्यामार्फत कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थ्यांची यादी तयार करुन ठिबक सिंचनासाठी कर्ज प्रस्ताव तयार करणे.

iii) जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेचे प्रतिनिधी यांनी कृषी अधिकाऱ्याने तयार केलेले कर्ज प्रस्ताव तपासून मंजूरीच्या शिफारशीसह जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस सादर करणे.

iv) कर्ज प्रस्ताव मंजूर करण्यासाठी कारखाना, बँक व शेतकरी यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करणेबाबतच्या कार्यवाहीचे सनियंत्रण करणे.

v) कर्ज मंजुरीनंतर बँकेने दिलेल्या कार्यादेशाप्रमाणे कारखान्याच्या कृषी अधिकाऱ्याने उत्पादक/पुरवठादार कंपनीकडून ठिबक संच बसवून कार्यान्वित करुन घेणे.

vi) ठिबक सिंचन कर्जासाठी कारखाना, बँक व शेतकरी यांच्यातील करारनाम्यानुसार कर्जापोटी मुद्दल व व्याजाच्या रकमा अंतिम ऊस बिलातून कपात करुन बँकेत जमा करण्यासंदर्भात वेळोवेळी आढावा घेऊन कार्यवाही करणे.

**०४.** योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान स्थानिक पातळीवरील परिस्थिती लक्षात घेवून तसेच मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार सदरील परिपत्रकामध्ये वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार राज्य स्तरीय समितीस राहतील.

**०५.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०४२७१७५३३१७३०२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरी करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांना आदेशानुसार व नावाने,

Deepak S Desai

Digitally signed by Deepak S Desai
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=CMT Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d11b2ee4dfa01facc6e58028a3bde93d4ac81d87ed6247ca0fb3a827602426f, cn=Deepak S Desai
Date: 2018.04.27 19:00:24 +05'30'

**(दिपक शि. देसाई)**
उप सचिव (साखर) महाराष्ट्र शासन

**प्रत:-**

१. मा. राज्यपाल महोदय यांचे खाजगी सचिव.
२. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व विधान परिषद सदस्य, यांचे खाजगी सचिव.
६. सर्व विधानसभा सदस्य, यांचे खाजगी सचिव.
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग मंत्रालय, मुंबई.

८. अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार विभाग मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव (जलसंधारण), जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई.
११. प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग मंत्रालय, मुंबई.
१२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५.जिल्हाधिकारी (सर्व साखर कारखाने लाभक्षेत्र)
१६.मुख्य अभियंता, जलसंपदा (सर्व साखर कारखाने लाभक्षेत्र).
१७.मुख्य अभियंता, जलसंधारण (सर्व साखर कारखाने लाभक्षेत्र).
१८. मुख्य व्यवस्थापकीय संचालक, नाबार्ड.
१९. विभागीय कृषी सहसंचालक कारखाना कार्यक्षेत्र.
२०. सहसंचालक (साखर) सर्व प्रादेशिक विभाग.
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई.
२२. कार्यकारी संचालक, सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका.
२३. जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी सर्व साखर कारखाने लाभक्षेत्र.
२४. उपसंचालक (कृषी) (सर्व साखर कारखाने लाभक्षेत्र).
२५. अधिक्षक अभियंता (सर्व साखर कारखाने लाभक्षेत्र).
२६. कार्यकारी संचालक (सर्व साखर कारखाने).
२७. कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी (सर्व साखर कारखाने).
२८. प्रगतीशिल शेतकरी प्रतिनीधी (सर्व साखर कारखाने).
२९. कृषी अधिकारी (सर्व साखर कारखाने लाभक्षेत्र).
३०. स्थानिक मंडळ, कृषी अधिकारी (सर्व साखर कारखाने लाभक्षेत्र).
३१. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
३२. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
३३. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
३४. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
३५. उपसचिव वित्त विभाग-व्यय-२/अर्थबळ/ अर्थोपाय/अर्थसंकल्प, मंत्रालय, मुंबई.
३६. उपसचिव कृषी व पदुम/ जलसंपदा/ जलसंधारण/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३७. अवर सचिव/कक्ष अधिकारी (सर्व कार्यासन) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
३८. निवडनस्ती- ३-स